वर्ष-०९ | अंक-४६ | मुंबई, मंगळवार ०३ ते ०९ ऑक्टोबर - २०२३ | पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती | मराठी साप्ताहिक | R.N.I. No. MAHMAR/2014/60133 | मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION No.PLG/205/2022-2024

# पोलीस बातमी पत्र

POLICE BATMI PATRA

●संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2 किवी फ्रूटची करा शेती

3 → पुसून टाकण्याचा प्रयत्न होऊनही गांधीविचार शाबूत राहातो...

सासूने घरात येण्यास मज्जाव केल्यानं पतीकडून पत्नीची हत्या, सासूवर हातोडीनं हल्ला ← 4

www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com

## मनसेचे टोल दरवाढविरोधात 'गांधीगिरी' आंदोलन



टोल दरवाढीविरोधात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने सोमवारी मुलुंड टोलनाक्यावरील कर्मचाऱ्यांना गुलाब पुष्प देत गांधीगिरी आंदोलन केले. यापुढे मनसेकडून शांततेची अपेक्षा करु नये असा इशारा आंदोलकांनी टोल कंपनीला यावेळी दिला. राज्य रस्ते विकास महामंडळ (एमएसआरडीसी) सध्यस्थितीत रस्त्याची देखभाल करीत नसून हे रस्ते मुंबई महापालिकेला हस्तांतरीत करण्यात आले आहेत. एकूण ५५ पैकी केवळ १३ उड्डाण पूलांची देखभाल एमएसआरडीसी प्राधिकरणाकडून केली जाते. त्यामुळे प्राधिकरण जर देखभाल करत नसेल तर त्यांच्यामार्फत टोल वसुल करणे चुकीचे आहे, असे मनसेचे म्हणणे आहे. टोल दरवाढ झालेली असून त्याविरोधात मसनेने आंदोलन सुरू केले आहे. रविवारी मनसेने ठाण्यातील चौकाचौकात आंदोलन केले होते. सोमवारी महात्मा गांधी यांच्या जंयतीचे औचित्य साधून मनसेचे शहरप्रमुख रवी मोरे यांनी मुलुंड चेकनाक्यावर 'गांधीगिरी' आंदोलन केले. काही कार्यकर्त्यांनी महात्मा गांधींची वेशभुषा केली होती. त्यांनी टोलवसुली करणाऱ्या कर्मचाऱ्यांना गुलाब पुष्प दिले. हे शेवटचे शांततेचे आंदोलन आहे. यापुढे शांततेची अपेक्षा मनसेकडून करु नये असा इशारा मोरे यांनी यावेळी दिला. टोल बंद होणार नसेल तर, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वाढीव टोलवाढ रद्द करावी अशी मागणीही त्यांनी यावेळी केली. आनंद परांजपे यांनी मनसेकडून नौटंकी सुरु असल्याचा आरोप केला होता. त्यावर मोरे यांनी उत्तर दिले. जे बाळासाहेबांचे झाले नाही, शरद पवार यांचे नाही झाले, उद्या ते आणखी कुठे जातील हे सांगता येणार नाही. त्यामुळे त्यांनी आमची काळजी करु नये अशी टिकाही त्यांनी केली.

# ठाण्यात 'स्वच्छता ही सेवा' उपक्रम शिवसेनेकडू न हायजॅक

**महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त पंतप्रधान नरें द्रमोदी यांनी के लेल्या आवाहनाला प्रतिसाद देत ठाणे महापालिके ने 'स्वच्छता ही सेवा' उपक्रम रविवारी आयोजित के ला होता**



ठाणे : महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत ठाणे महापालिकेने 'स्वच्छता ही सेवा' उपक्रम रविवारी आयोजित केला होता. शहरात तीनशे ठिकाणी राबविलेल्या या उपक्रमात शिवसेना (शिंदे गट) पदाधिकारी आणि कार्यकर्ते सहभागी झाल्याने शिवसेनेकडून हा उपक्रमच हायजॅक करण्यात आल्याचे चित्र दिसून आले. महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना 'स्वच्छता ही सेवा' हे अनोखे अभियान जाहीर केले आहे. हे अभियान राज्यात मोठ्या उत्साहाने साजरे करण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले होते. त्यानुसार, ठाणे महापालिका क्षेत्रातील प्रत्येक वॉर्डमधील तीनशे ठिकाणी रविवारी सकाळी १० वाजता स्वच्छतेसाठी एक तास श्रमदान हा उपक्रम पालिकेने आयोजित केला होता. या उपक्रमाची सुरुवात आयुक्त अभिजित बांगर, माजी महापौर नरेश म्हस्के यांच्या उपस्थितीत माजिवडा उड्डाणपूलाखाली असलेल्या तिरंगा चौकातून झाली. त्याचबरोबर शहरात तीनशे ठिकाणी हा उपक्रम राबवून श्रमदानाने परिसर स्वच्छ करण्यात आला. ठाणे महापालिकेवर शिवसेनेची अनेक वर्षे सत्ता आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली अनेक वर्षांपासून पालिकेचे कामकाज सुरू आहे. यामुळे शिवसेनेतील फुटीनंतरही पालिकेवर शिंदे यांचे वर्चस्व आहे. अनेक कार्यक्रमांमधून हे चित्र दिसून आले असून रविवारी पार पडलेल्या 'स्वच्छता ही सेवा' उपक्रमातही हे चित्र दिसून आले. हा उपक्रमसाठी यशस्वी माजी महापौर नरेश म्हस्के यांनी माजी नगरसेवकांची आयुक्तांसोबत तीन दिवसांपूर्वी बैठक घेतली होती. त्याचबरोबर पक्षाचे विभागप्रमुख आणि शाखाप्रमुखांच्या बैठका घेऊन त्यांना स्वच्छतेसाठी ठिकाण निवडून दिली होती. शिवाय, विविध सत्संगचे सेवक, महाविद्यालय विद्यार्थी यांनाही उपक्रमात सामील करून घेतले होते. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आखून दिलेले कार्यक्रम भाजपकडून मोठ्याप्रमाणात राबविले जातात. पण, या कार्यक्रमात मात्र भाजपपेक्षा शिवसेना (शिंदे गट) आघाडीवर असल्याचे दिसून आले. भाजपचे आमदार संजय केळकर आणि काही पदाधिकारी या उपक्रमात सामील झाले असले तरी सर्वच ठिकाणी शिवसेना (शिंदे गट) पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्याप्रमाणात ...पान २ वर...

## डोंबिवलीत बिगारी कामगाराला खुर्चीला बांधून बेदम मारहाण



डोंबिवली: येथील पूर्व भागातील आयरेगाव हद्दीतील बालाजी गार्डन संकुलाच्या पाठीमागील भागात एका कार्यालयात बिगारी कामगाराला पाचजणांनी शुक्रवारी रात्री खुर्चीला बांधून ठेवले. रात्रभर त्याला बेदम मारहाण करुन गंभीर दुखापत केली आहे. साहिल चव्हाण (२२), राहुल पाटील (३०) आणि त्यांचे तीन साथीदार अशी आरोपींची नावे आहेत. आकाश झुंजारे (२२) या बिगारी कामगाराने याप्रकरणी रामनगर पोलीस ठाण्यात आरोपींविरुध्द तक्रार केली आहे. राहुल पाटील याचा वाढदिवस ...पान २ वर...

## चोरीच्या तक्रारींसाठी केवळ १७ रेल्वे स्थानकांत सोय; पोलीस ठाण्यांबाहेर प्रवाशांच्या रांगा




ठाणे : मध्य, पश्चिम आणि हार्बर रेल्वे मार्गावरील एकूण ११७ स्थानकांवर मोठ्या प्रमाणात मोबाइल, पाकीट चोरीच्या घटना घडतात. मात्र, या घटनांच्या तक्रारी नोंदवण्याची सोय केवळ १७ स्थानकांवर असल्यामुळे तेथील रेल्वे पोलीस ठाण्यांबाहेर तक्रारदार प्रवाशांच्या दररोज रांगा लागतात. मध्य, पश्चिम आणि हार्बर मार्गावर सीसीटीव्ही, पोलीस बंदोबस्त असतानाही प्रवाशांचे मोबाइल, पाकिटे चोरण्याचे प्रकार सुरू आहेत. लोहमार्ग पोलीस ठाण्यांची हद्द मध्य आणि हार्बर मार्गावर मुंबई छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते पनवेल, कर्जत, कसारा तसेच पश्चिम रेल्वे मार्गावर चर्चगेट ते डहाणू रोडपर्यंत आहे. या भागात एकूण ११७ रेल्वे स्थानके आहेत. त्यातील केवळ १७ स्थानकांवर पोलीस ठाणे उपलब्ध आहेत. या सर्वच ठिकाणी महिन्याला सरासरी नऊशे ते एक हजार गुन्हे दाखल होत आहेत. त्यापैकी ९० ते ९५ टक्के गुन्हे मोबाइल चोरीचे असतात. तर, उर्वरित गुन्ह्यांमध्ये पाकीट चोरी किंवा इतर प्रकरणांचा समावेश आहे. मध्य रेल्वे मार्गावर दादर, कुर्ला, कल्याण आणि ठाणे हे सर्वाधिक गर्दीची रेल्वे स्थानके असून याठिकाणी पोलीस ठाणे आहेत. यातील कल्याण रेल्वे पोलीस हद्दीमध्ये १४ रेल्वे स्थानके येतात. दादरमध्ये सहा, कुर्ला येथे आठ, ठाणे पोलीस ठाण्याच्या हद्दीत पाच रेल्वे ...पान २ वर...

## मराठी लोकांबद्दल टिप्पणी, कल्याण मध्ये परप्रांतीय फे रीवाल्यांना मनसैनिकांचा चोप



कल्याण– कल्याण रेल्वे स्थानकातील स्कायवाॅकवर फेरिवाल्यांकडून खरेदी केलेली वस्तु खराब असल्याने ती परत करत एका तरुणाने पैसे मागितले. परंतु पैसे देण्यास नकार देत 'तुम्ही मराठी लोक असेच असतात' अशी उपरोधिक शब्दात फेरिवाल्याने टिपण्णी केली. यावरून झालेल्या वादानंतर मनसैनिकांनी घटनास्थळी येऊन फेरीवाल्यांना चोप दिला. रविवारी हा प्रकार कल्याण पूर्वेतील स्कायवॉकवर घडला. यासंदर्भातची एक दृकश्राव्य ध्वनी चित्रफित समाज माध्यमावर प्रसारित झाली आहे. मिळालेली माहिती अशी, शहापूर तालुक्यातील वासिंद भागात राहणारा एक मराठी तरूण कामानिमित्त कल्याणमध्ये आला होता. काम आटोपल्यानंतर तो कल्याण रेल्वे स्थानकातून आसनगाव लोकलने घरी जाणार होता. कल्याण रेल्वे स्थानकातील स्कायवॉकवर एका फेरीवाल्याकडून तरुणाने एक वस्तू पैसे देऊन ...पान २ वर...

## उधारीचे 5 लाख अडकले, बीडचा पठ्ठ्या स्वतः वकील झाला; के स लढू न पै पै वसूल के ले




अनेकदा ओळखीच्या लोकांना मदत म्हणून आपण उधार पैसे देत असतो. मात्र, बीडमध्ये एका तरुणाला आपल्या मित्राला पाच लाख रुपयांची मदत करणं चांगलंच महागात पडले आहे. कारण, उधार दिलेले पाच लाख रुपये परत मिळत नसल्याने हतबल झालेल्या या तरुणाला चक्क वकिलीचं शिक्षण घ्यावे लागले. तसेच वकील झाल्यावर स्वतः न्यायालयात केस लढवून त्याने आपले उधारीचे पाच लाख परत मिळवत केस जिंकली. या आगळ्यावेगळ्या प्रकरणाची सध्या जिल्ह्यात जोरदार चर्चा आहे. त्याचं झाले असे की, सागर नाईकवाडे यांनी त्यांचा मित्र जावेद रहीम सय्यद याला 2015 साली त्याची कौटुंबिक आणि व्यावसायिक अडचण असल्यामुळे पाच लाख रुपये उसने दिले होते. वर्षाखेरीस हे पाच लाख रुपये परत देण्याचा वादा जावेदने सागर याच्याकडे केला होता. मात्र, वारंवार पैशाची मागणी करून देखील जावेदकडून पैसे मिळत नसल्याने सागर नाइकवाडे यांनी त्याच्याकडे पैशाचा तगादा लावला. त्यानंतर जावेद सय्यद याने पाच लाख रुपयांचा चेक सागर नाईकवाडे यांना दिला. पुण्यातल्या कोथरूड शाखेचा हा पाच लाख रुपयाचा चेक सागर नाईकवाडे यांनी बँकेत टाकला असता, बँकेकडून अपुरी रक्कम या शेऱ्यासह तोच चेक परत पाठवण्यात आला. त्यामुळे या दोघांच्या मैत्रीमध्ये व्यवहारामुळे फूट पडली. अडचणीत असलेल्या मित्राला पाच लाख रुपये देणारे सागर नाईकवाडे अडचणीत सापडले होते. जावेदला दिलेले पाच लाख रुपये आता कसे परत मिळवायचे असा प्रश्न त्यांना पडला होता. चेक बाऊन्स झाल्यावर सागर नाईकवाडे यांनी जावेदला पाच लाख रुपये परत मिळावे, यासाठी कायदेशीर नोटीस पाठवली. तसेच, बीडच्या प्रथमवर्ग न्यायदंड अधिकारी यांच्या न्यायालयात हे प्रकरण सुरू झालं. दरम्यान याच काळात आपली बाजू मांडण्यासाठी आणि आपले पाच लाख परत मिळवण्यासाठी नाईकवाडे यांनी वकिलीचे शिक्षण म्हणजेच एलएलबीसाठी प्रवेश घेतला. शिक्षण पूर्ण करून त्यांनी बीडच्या प्रथम न्यायदंडाधिकारी यांच्यासमोर आपली बाजू भक्कमपणे मांडली. यावेळी नाईकवाडे यांच्यावतीने न्यायालयासमोर सादर केलेली कागदपत्रे, पुरावे व केलेल्या युक्तिवाद ग्राह्य धरून आरोपी जावेद यास ...पान २ वर...

## नागझरीत सराफा व्यापाऱ्याला बंदुकीच्या धाकानं लुटण्याचा प्रयत्न, निर्म नुष्य जागेत गाठू न यापाऱ्यावर झाडल्या गोळ्या



पालघरच्या (Palghar News) नागाझरीत ज्वेलर्सच्या दुकानातील सोनं आणि चांदीचे दागिने घरी घेऊन जात असलेल्या सराफा व्यापाऱ्याला बंदुकीच्या धाकानं लुटण्याचा प्रयत्न करण्यात आला. एवढंच नाहीतर निर्मनुष ठिकाणी दोघांनी सराफा व्यापाऱ्यावर बंदुकीतून गोळ्याही झाडल्या. परंतु, सराफा व्यापाऱ्यानं प्रसंगावधान दाखवल्यामुळे थोडक्यात अनर्थ टळला. त्यानंतर व्यापाऱ्यानं आरडाओरडा केल्यानं चोरे घटनास्थळावरुन फरार झाले. दरम्यान, मनोर पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखेकडून याप्रकरणाचा तपास सुरू आहे. ज्वेलर्सच्या दुकानातील सोन्या-चांदीचे दागिने घरी घेऊन जात असलेल्या सराफाला बंदुकीच्या धाकानं लुटण्याचा अयशस्वी प्रयत्न दोन चोरट्यांकडून करण्यात आला. रविवारी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास नागझरी नाक्यापासून नागझरी गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावरील निर्मनुष्य ठिकाणी दोघांनी सराफाला लुटण्याच्या उद्देशाने बंदुकीतून तीन गोळ्या झाडल्या, परंतु प्रसंगावधान राखत सराफ खाली वाकल्यानं थोडक्यात बचावला. बंदुकीतून गोळ्या झाल्यानंतर घाबरलेल्या सराफा व्यापाऱ्यानं आरडाओरडा केला आणि त्यानंतर चोरटे घटनास्थळावरून पळून गेले. घटनास्थळी ...पान २ वर...

## अंगावर गरम चहा सांडल्याने चिमुकली जखमी, मुंबईच्या पंचतारांकित हॉटे लमधील प्रकार; वेटरवर गुन्हा दाखल



मुंबईतील एका पंचतारांकित हॉटेलमध्ये वेटरेने चिमुकलीच्या अंगावर गरम चहा पाडल्याची घटना घडली आहे. अंगावर गरम चहा पडल्याने चिमुकलीला दुखापत झाली. या प्रकरणी मुलीच्या पालकांच्या तक्रारवरून हॉटेलच्या वेटरवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मुंबईच्या अंधेरीतील जे.डब्ल्यू. मॅरियट हॉटेल मध्ये ही घटना घडल्याची माहिती समोर आली आहे. याप्रकरणी आता वेटरवर गुन्हा दाखल झाला आहे. अंगावर गरम चहा सांडल्याने चिमुकली जखमी सहार पोलीस स्टेशनमध्ये 29 सप्टेंबर रोजी भारतीय दंड विधान कायद्याच्या कलम 337 अंतर्गत जीवाला धोका निर्माण करणाऱ्या कृत्यामुळे दुखापत करणे, याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एफआयआरनुसार, 50 वर्षीय निशांत जैन हे एंजल ब्रोकिंग कंपनीचे मुख्य व्यवसाय अधिकारी आहेत. जैन यांनी पोलीस जवाब दिलेल्या माहितीप्रमाणे, त्यांनी 24 सप्टेंबर रोजी ...पान २ वर...

पोलीस बातमी पत्र

मुंबई

२

मुंबई, मंगळवार ०३ ते ०९ ऑक्टोबर - २०२३



# किवी फ्रूटची करा शेती

**देशात अलीकडे शेतकरी बांधव पारंपरिक शेतीला फाटा देत वेगवेगळ्या नगदी तसेच फळबाग पिकांची लागवड करीत आहेत. शेतकरी बांधवांना यातून चांगला नफा देखील प्राप्त होत आहे. देशात सध्या किवी फ्रूटची मोठ्या प्रमाणात लागवड केली जात आहे. किवी हे एक विदेशी फळ आहे. मात्र, याची देशातील बाजारपेठेत मागणी वधारली आहे, त्यामुळे किवी फ्रूटची शेती शेतकऱ्यांसाठी फायदेशीर सिद्ध होत आहे. त्यामुळे याची मागणी दिवसेंदिवस वाढतच आहे. म्हणून किवी फ्रूटच्या शेतीविषयी जाणून घेऊ..**

किवी फ्रूट मानवी शरीरासाठी देखील अतिशय फायदेशीर असल्याचे सांगितले जाते. यामध्ये असलेले औषधी गुणधर्म मानवी आरोग्यासाठी फायदेशीर असल्याचे सांगतात. किवी फ्रूटमध्ये व्हिटॅमिन बी आणि व्हिटॅमिन सी मोठ्या प्रमाणात आढळते. यामध्ये पोटॅशियम, मॅग्नेशियम, फायबर, कॉपर, सोडियम इत्यादी पोषकतत्त्वे आढळतात. त्यामुळे त्याचे सेवन आपल्या शरीरासाठी फायदेशीर असते.

कृषी वैज्ञानिकांच्या मते किवी फ्रूटची लागवड भारतातदेखील केली जाऊ शकते. किवीची लागवड साधारणतः जानेवारी महिन्यात केल्यास त्यापासून दर्जेदार उत्पादन प्राप्त होते.

**जमीन:-** किवी फ्रूटची लागवड पाण्याचा चांगला निचरा होणाऱ्या जमिनीत करण्याची शिफारस केली जाते. किवीची लागवड सुपीक, भारी, पाण्याचा चांगला निचरा होणाऱ्या वाळूमिश्रित, चिकन माती असलेल्या जमिनीत केल्यास यापासून दर्जेदार उत्पादन प्राप्त होते.

किवी फ्रूटची लागवड अशा जमिनीत करावी जिथे ७.३ पेक्षा कमी पीएच असतो. किवी फ्रूटची लागवड अशा जमिनीत करू नये, ज्या जमिनीत पाणी धरून ठेवण्याची क्षमता जास्त असते. तसेच ज्या जमिनीत पावसाळ्याचे पाणी साचते त्या जमिनीतदेखील किवी फ्रूटची लागवड केली जाऊ शकत नाही.

**लागवड-** किवी फ्रूटच्या दोन रोपातील अंतर १८ फूट असले पाहिजे, तसेच दोन ओळीतील अंतर बारा फुटाच्या दरम्यान असले पाहिजे. किवी फ्रूट एक वेलवर्गीय झाड असते. याच्या लागवडीतील सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे किवी फ्रूटची नर आणि मादी अशी दोन्ही प्रकारची झाडे लावावी लागतात.

नऊ मादी झाडांमागे एक नर किवी फ्रूटचे झाड लावावे लागते. शेतकरी मित्रांनो, जर आपणास एक हेक्टर क्षेत्रात किवी फ्रूटची लागवड करायची असेल तर आपणास सुमारे चारशे पंधरा किवीची झाडे लावावी लागतील.

**पाणी व्यवस्थापन-** किवी फ्रूट लागवडीत पाण्याचे व्यवस्थापन करणे अतिशय महत्त्वाचे ठरते. किवीला उन्हाळी हंगामात जास्त पाणी लागते. उन्हाळ्यात पंधरवड्याला पाणी द्यावे लागते. लागवडीत जर योग्य पाणी व्यवस्थापन केले तर दर्जेदार उत्पादन प्राप्त केले जाऊ शकते.

अलिकडे देशांतर्गत बाजारपेठेत किवीची मागणी वाढल्याने किवी लागवडीस आपल्या राज्यातही सुरूवात झाली आहे. एक हमखास उत्पन्न देणारे पिक म्हणून किवी लागवड केली जात आहे.



# बांबू शेती ठरतेय फायदेशीर

**बांबू या पिकाला पाणी आणि खते यांचे प्रमाण फारच कमी लागते. तसेच रोगप्रतिकारक शक्ती जास्त असल्याने पिकासाठी कीटकनाशकांचा वापर सुद्धा कमी होतो. आशिया खंडात गेल्या वीस वर्षांपासून बांबूचे उत्पादन लक्षणीय वाढले आहे.**



महाराष्ट्रात मानवेल, कटांग कटस, कोंड्या मेस, पिवळा बांबू या प्रजातीचे बांबू आढळतात. बांबूची लागवड केल्यापासून साधारणतः पाच वर्षांनी त्याचे उत्पन्न मिळायला लागते. त्यानंतर साडेचार लाख रुपयांपर्यंतचे उत्पन्न प्रतिमहिना मिळू शकते. हस्तकला, शेती, फर्निचर, खाद्य, बांधकाम, कागद उद्योगासाठी बांबूचा उपयोग होतो.

शेतकऱ्यांना बांबू लागवडीसाठी प्रोत्साहन मिळावे यासाठी महाराष्ट्र बांबू विकास मंडळाकडून टिशू कल्चर रोपे दिली जातात. महाराष्ट्र सरकार टिशू कल्चर बांबू रोपे उपलब्ध करून देते. ही रोपे सरकार सवलतीच्या दरात देत असते. यासाठी सरकारने अटल बांबू समृद्धी योजना सुरु केली आहे. या योजनेसाठी महाराष्ट्र बांबू विकास मंडळाच्या साइटवर जाऊन बांबू शेतीसाठी असलेल्या अनुदानाची माहिती आणि अर्ज करू शकता. या योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना टिशू कल्चर बांबू रोपांचा पुरवठा करणे, शेतीतून मिळणाऱ्या उत्पन्नाला जोड देण्यासाठी शेतजमिनीवरील बांबू लागवडीखालील क्षेत्र वाढवणे तसेच बांबू लागवडीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना उपजीविकेचे साधन निर्माण करणे ही कामे महाराष्ट्र बांबू विकास मंडळ करते.

**बांबू लागवडीचे फायदे-** बांबू प्रजातीचे जीवनचक्र ४० ते १०० वर्षं असल्याने दरवर्षी बांबू लागवड करण्याची आवश्यकता राहात नाही. बांबूला कमी किंवा जास्त पाऊस झाला तरी शेती सारखे नुकसान होत नाही. बांबूच्या बेटामध्ये दरवर्षी आठ ते दहा नवीन बांबू तयार होत असतात. पाणी साचलेल्या जमिनीवर, क्षारयुक्त जमीन तसेच मुरमाड जमिनीवर सुद्धा बांबूची लागवड करता येते.

इतर पिकांच्या तुलनेत बांबूच्या शेतीवर ३० ते ४० टक्के खर्च कमी येतो. पहिल्या व दुसऱ्या वर्षाचे बांबू सोडून तिसऱ्या वर्षांनंतर बांबू काढता येत असल्याने शाश्वत उत्पन्न मिळते.

**बांबूसाठी बाजारपेठ-** महाराष्ट्र बांबू विकास मंडळाच्या माध्यमातून बांबूसाठी बाजारपेठ उपलब्ध करून दिली जाते. बांबूच्या टिश्युकल्चर रोपांचा दर अंदाजे २५ रुपये प्रतिरोप आहे. बांबू रोपे अगोदर खरेदी करून त्याची शेतजमिनीवर लागवड करावी. शेतजमिनीवर लागवड केलेल्या बांबूच्या तपासणीनंतर बांबू रोपांच्या किमतीपैकी शासनाकडून चार हेक्टर किंवा त्याखालील शेती असलेल्या भूधारकांना ८० टक्के तर चार हेक्टरपेक्षा अधिक शेती असलेल्या भूधारकांना ५० टक्के सवलतीच्या दराने त्यांच्या बँक खात्यात अनुदान जमा होते.

# सिमला मिरचीवरील रोग

**सिमला मिरची ही भारतातील खास भाज्यांपैकी एक आहे. त्याची लागवड शेतकऱ्यांना उत्पन्नाच्या दृष्टीने खूप फायदेशीर ठरू शकते. सिमला मिरची ही बहुमुखी आणि उच्च मूल्याची भाजी आहे. ज्याला स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय बाजारात चांगली मागणी आहे.**



सिमला मिरची लागवडीसाठी ऑगस्ट महिना सर्वात खास मानला जातो. कारण या महिन्यात पावसामुळे पाण्याची समस्या नाही. या महिन्यात कोणत्याही पिकाच्या झपाट्याने वाढीबरोबरच उत्पादनही चांगले होते. जर तुम्हीही सिमला मिरचीची लागवड करण्याचा विचार करत असाल तर या कथेद्वारे पिकाला होणारे आजार आणि त्यापासून बचाव करण्याचे उपाय जाणून घेऊ..

**रोग :** जीवाणूजन्य पानांचे ठिपके या रोगाचा प्रादुर्भाव झाल्यानंतर सिमला मिरचीच्या पानांवर पिवळे प्रभामंडल असलेले लहान, पाण्यात भिजलेले ठिपके दिसतात, जे नंतर तपकिरी किंवा काळे होतात. हे टाळण्यासाठी रोग प्रतिकारक वाणांचा वापर करावा. वरून झाडांना पाणी द्या जेणेकरून पाणी पानांवर पडणार नाही. जमिनीत रोगजनकांना प्रतिबंध करण्यासाठी पीक लागवडीची जागा बदलत राहा.

**फायटोफ्थोरा ब्लाइट:** हे देठ आणि फळांवर खोल पाण्यात भिजलेली जखम दाखवते. याच्या प्रभावामुळे पाने कोमेजून कुजण्याची लक्षणे दिसू शकतात. हे टाळण्यासाठी पिकाच्या आजूबाजूला पाणी साचू देऊ नका. पानांवर जास्त पाणी देणे आणि सिंचन टाळा. रोगाचा प्रसार रोखण्यासाठी संक्रमित झाडे काढून टाका. ज्यामध्ये, प्रतिबंधात्मक उपाय म्हणून मेटालॅक्सिल बुरशीनाशक वापरा.

**व्हर्टिसिलियम विल्ट:** पाने पिवळी आणि कोमेजतात. काही प्रकरणांमध्ये पाने पूर्णपणे मरतात. हे टाळण्यासाठी प्रमाणित रोगमुक्त बियाणे व रोपे वापरावीत. चांगल्या निचरा होणाऱ्या जमिनीत लागवड करा आणि जास्त सिंचन टाळा. जमिनीत रोगजनकांचा जमाव कमी करण्यासाठी पिके फिरवा. या रोगासाठी कोणतेही प्रभावी रासायनिक उपचार नाहीत, त्यामुळे प्रतिबंध आणि व्यवस्थापन धोरणांवर लक्ष केंद्रित केले जाते.

**पावडर बुरशी :** यामध्ये पाने, देठ आणि फळांवर पांढरे पावडर ठिपके दिसतात. हे टाळण्यासाठी, हवेच्या चांगल्या अभिसरणासाठी झाडांमध्ये पुरेसे अंतर ठेवा. झाडांभोवती ओलावा कमी करण्यासाठी ओव्हरहेड पाणी देणे टाळा. प्रतिबंधात्मक उपाय म्हणून सल्फर किंवा पोटॅशियम बायकार्बोनेट वापरा.

**ॲफिड्चा प्रादुर्भाव :** ॲफिड हे लहान आणि मऊ शरीराचे कीटक आहेत जे वनस्पतींमधून रस शोषतात. यामुळे वाढ खुंटते आणि पाने विकृत होतात. हे टाळण्यासाठी, लेडीबग्स आणि लेसविंग्ससारख्या नैसर्गिक भक्षकांना प्रोत्साहन द्या. ॲफिड लोकसंख्या नियंत्रित करण्यासाठी कीटकनाशक किंवा कडुलिंबाच्या तेलाचा वापर करा. वनस्पतींभोवती ॲल्युमिनियम फॉइल ॲफिड्सला प्रतिबंध करू शकते. येथे लक्षात घेण्याजोगा मुद्दा असा आहे की जेव्हा वनस्पती रोगांचे व्यवस्थापन करण्याचा विचार येतो तेव्हा उपचारापेक्षा प्रतिबंध नेहमीच चांगला असतो. कोणतेही पीक रोगांपासून दूर ठेवण्यासाठी, योग्य स्वच्छता राखणे, रोगप्रतिरोधक वाणांचा वापर करणे आणि झाडे निरोगी ठेवण्यासाठी योग्य परिस्थिती प्रदान करणे आवश्यक आहे.



# जंत प्रादुर्भावामुळे जनावरांमध्ये कोणती लक्षणे दिसतात?

जंतामुळे जनावरे मृत्युमुखी पडण्याचे प्रमाण नगण्य असल्याने जंतांच्या प्रादुर्भावाकडे दुर्लक्ष होते. जनावरांमध्ये जंत प्रादुर्भाव झाल्यास विशेषतः पावसाळा, हिवाळा ऋतूमध्ये ठरावीक कालांतराने जंतनाशकाची मात्रा दिली जाते.

विशेषतः शेळी-मेंढीमध्ये सातत्याने जंतनिर्मूलन करावे लागते. कारण त्यांच्यामध्ये नियमितपणे जंताचा प्रादुर्भाव होतो. जनावरांच्या शरीरामध्ये प्रामुख्याने गोल कृमी जंत, पट्टिका कृमी जंत, चपट कृमी किंवा पर्ण कृमी जंत आढळून येतात. जंत लक्षणीय प्रमाणात जनावराच्या शरीराला हानी पोहोचवत असतात, परंतु अशी लक्षणे बहुधा सौम्य असतात.

गंभीर लक्षणे निर्माण न करणाऱ्या परोपजीवी आजाराकडे मात्र आपले लक्ष वेधले जात नाही. जनावरांमध्ये जंतांचा प्रादुर्भाव झाल्यास कोणती लक्षणे दिसतात या विषÆची माहिती पाहू या...



**जंत प्रादुर्भावामुळे जनावरांमध्ये आढळणारी लक्षणे :**

* जंतांचा प्रादुर्भाव झाल्यामुळे जनावर रोज थोडे थोडे खंगत जात असते. दुबळे व अशक्त होते.

* जनावराचे वजन, दूध उत्पादन, मांस उत्पादन आणि रोग प्रतिकारशक्ती अतिशय कमी होत जाते.

* जनावराची भूक मंदावते आणि जनावर चारा कमी खाते.

* दूध देणाऱ्या जनावरांमध्ये तीस टक्के उत्पादन कमी होते.

* जनावरांची कातडी रबरासारखी निस्तेज खडबडीत निबर होते.

* जनावरांचे केस राठ उभे राहतात. मोठ्या प्रमाणात केस गळती वाढते.

* लहान जनावरांमध्ये अतिसार सुरू होतो. बाधित जनावरांची विष्ठा/शेण पातळ होते. शेणाला नासक्या अंड्यासारखा वास येतो.

* शेळ्या, मेंढ्या, जनावरांमध्ये जबड्याच्या खालच्या बाजूला कातडीखाली पाणी साचून सूज येते.

* म्हशीच्या पारडीमध्ये मातकट रंगाची चिकट विष्ठा तयार होऊन संपूर्ण गोठ्यामध्ये दुर्गंधी पसरलेली असते.

* वासरे अशक्त होऊन खंगत जातात आणि त्यांची वाढ खुंटते. रेड्यामध्ये जंतांच्या बाधेमुळे मरतुकीचे प्रमाण लक्षणीयरीत्या अतिशय जास्त आढळून येते.

अशा प्रकारे जनावरांची काळजी घ्यावी.

## डोंबिवलीत बिगारी कामगाराला

आहे. आपणास तो उत्साहाने साजरा करायचा आहे. तू आयरेगाव भागातील बालाजी गार्डन गृहसंकुलामागील राहुल पाटील यांच्या कार्यालयात ये, असा निरोप आरोपींनी तक्रारदार आकाश झुंजारे याला दिला. मित्राचा वाढदिवस असल्याने शुक्रवारी रात्री ११ वाजता आकाश हा राहुल पाटील यांच्या कार्यालयात गेला. तेथे आरोपी साहिल, राहुल आणि त्यांचे तीन साथीदार उपस्थित होते. आकाशने वाढदिवसाविषयी विचारणा केल्यानंतर पाचही आरोपींनी आकाशला पकडून कार्यालयातील प्लास्टिकच्या एका खुर्चीत बसविले. त्याला दोरीने घट्ट बांधून घेतले. त्याला पाच आरोपींनी लाथाबुक्क्यांनी कमरेच्या पट्ट्यांनी बेदम मारहाण केली. या मारहाणीत आकाशला गंभीर दुखापत झाली आहे, असे पोलिसांनी सांगितले.

## नागझरीत सराफा व्यापाऱ्याला

पोलिसांचं पथक दाखल झालं असून मनोर पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखेकडून समांतर पद्धतीनं तपास सुरू करण्यात आला आहे. चार वर्षांपूर्वी नागझरी नाक्यावरील दुर्वांकुर ज्वेलर्सच्या दुकानात चोरी झाल्यानं ज्वेलर्सचे मालक भाईदास कंडी (वय 47) दररोज त्यांचं दुकान बंद करताना दुकानातील सोनं चांदीचे दागिने घेऊन घरी जात होते. रविवारी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास नेहमीप्रमाणे दुचाकीवरून दुकानातील दागिने घेऊन नागझरी गावातील पवन विहार सोसायटीमध्ये जात होते. नागझरी नाका ते नागझरी गावा दरम्यानच्या निर्मनुष्य जागेत दबा धरून बसलेल्या दोघांनी दागिने लुटण्याच्या उद्देशानं त्यांच्या दिशेनं बंदुकीतून तीन गोळ्या झाडल्या, परंतु प्रसंगावधान राखल्यानं बंदुकीच्या गोळ्या भाईदास कंडी यांना लागल्या नाही. लाखो रुपयांचे दागिने सोबत असताना बंदुकीच्या गोळ्या झाडल्यानं घाबरलेल्या भाईदास कंडी यांनी आरडाओरडा सुरू केला, नागझरी नाका नजीक असल्यानं गर्दी होण्याच्या भीतीनं चोरांनी अंधाराचा फायदा घेत उंच वाढलेल्या गवतातून पळ काढला. घटनेची माहिती मिळताच मनोर पोलीस ठाण्याचे अधिकारी आणि कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले असून घटनास्थळा वरून बंदुकीच्या गोळ्यांच्या दोन रिकाम्या पुंगळ्या हस्तगत करण्यात आल्या आहेत. घटनास्थळा वरून पसार झालेल्या चोरांना पकडण्यासाठी चिल्हार बोईसर रस्त्यावर नाकाबंदी लावण्यात आली आहे. दरम्यान, रात्री दहा वाजण्याच्या सुमारास पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांनी घटनास्थळाला भेट देत मनोर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सतीश शिवरकर यांना तपासाबाबत मार्गदर्शन केलं. दरम्यान, दुर्वांकुर ज्वेलर्समध्ये चार वर्षांपूर्वी चोरी झाली होती.

## ठाण्यात ‘स्वच्छता ही सेवा’

उपक्रमात उतरल्याचे दिसून आले. अगदी उपक्रमाच्या नियोजनापासून ते सहभागापर्यंत शिवसेना सहभागी झाल्याने हा उपक्रम त्यांनी हायजॅक केल्याचे दिसून आले. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हा कार्यक्रम आखून दिला होता राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनी हा एक उपक्रम यशस्वी करण्याचे आवाहन केले होते. त्यानुसार हा कार्यक्रम यशस्वी करण्याचे काम आम्ही केले या कार्यक्रमाला कोणीही पक्षी दृष्टिकोनातून पाहून राजकीय रंग देण्याचा प्रयत्न करू नये. -नरेश म्हस्के, शिवसेना राज्य प्रवक्ते

## अंगावर गरम चहा सांडल्याने चिमुकली जखमी

अंधेरी पूर्व मध्ये जे.डब्ल्यू. मॅरियट हॉटेल मध्ये एक रूम बुक केली होती. त्यांच्यासोबत त्यांची पत्नी आणि 14 वर्षांची सारा आणि 7 वर्षांची मायरा या त्यांच्या दोन मुली होत्या. मुंबईच्या पंचतारांकित हॉटेलमधील प्रकार जैन कुटुंब 29 सप्टेंबर रोजी रात्री 9.30 वाजता हॉटेलच्या रेस्टॉरंटमध्ये नाश्ता करण्यासाठी आले. मायरा काउंटरवरून नाश्ता घेत असताना मोनालिसा बासुमती नावाची वेटर गरम चहाची किटली असलेला ट्रे घेऊन जात होती. फिर्यादीनुसार, वेटरने तिच्या समोर कोण आहे, हे तिला दिसले नाही आणि त्यामुळे ती अचानक मायराशी आदळली आणि गरम चहा मायराच्या डाव्या हातावर सांडला. गरम चहा अंगावर सांडल्यामुळे मायराला दुखापत झाली, त्यामुळे मायरा जोरजोरात रडू लागली. वेटरवर गुन्हा दाखल

मायराच्या वडिलांनी तिला तातडीने रुग्णालयात नेले, जिथे डॉक्टरांनी तिचे निदान करत सांगितलं की, तिला एलएफ फोअरआर्म 6 ते 7 टक्के बर्न्स आहेत. त्यानंतर, जैन कुटुंबाने मायराच्या आजोबांच्या भेटीसाठी ठाण्याला गेले. मायराचे आजोबा विलासचंद्र पोरवार , वय 72 वर्ष यांनी 29 सप्टेंबर रोजी सहार पोलीस ठाण्यात त्या वेटरविरुद्ध गुन्हा दाखल केला. वेटरकडून मायराला ओरडा

या प्रकरणी एका प्रत्यक्षदर्शीने दिलेल्या माहितीनुसार, एका परदेशी व्यक्तीने यावेळी काय घडलं हे सांगितलं. या परदेशी व्यक्तीने सांगितलं की, मायराच्या अंगावर गरम चहा सांडल्यांतर वेटरकडून मायराला ओरडली.

## उधारीचे 5 लाख अडकले,

उसने घेतलेल्या पाच लाख रुपयांची रक्कम, तसेच तीन लाख रुपये दंड व सहा महिन्याची शिक्षा सुनावण्यात आली आहे. जिद्दीला पेटले अन्...

सागर नाईकवाडे आणि जावेद यांच्यात चांगली मैत्री होती. त्यामुळे मित्र अडचणीत असल्याचे समजल्यावर त्याला मदत म्हणून नाईकवाडे यांनी अडचणीत पाच लाखांची मदत केली. पण, पुढे जावेदकडून ठरलेल्या वेळेत पैसे देणे झाले नाही. अनकेदा मागणी करून देखील पैसे आले नाही. त्यामुळे त्यांनी जावेदने दिलेला चेक बँकेत टाकला, मात्र त्यात देखील पैसे नव्हते. त्यामुळे मित्राने आपली फसवणूक केल्याचे त्यांच्या लक्षात आले. शेवटी जिद्दीला पेटलेल्या नाईकवाडे न्यायालयाय धाव घेतली आणि सोबतच स्वतः वकिलीचे शिक्षण घेतलं. आपली बाजू न्यायालयात मांडली आणि केस जिंकली सुद्धा.

## मराठी लोकांबद्दल टिप्पणी

खरेदी केली. ती वस्तू खराब वाटली म्हणून तरुणाने ती परत करुन फेरीवाल्याकडून पैसे परत मागितले. फेरीवाल्याने पैसे देण्यास नकार दिला. त्यावेळी तरुणाने वस्तू खराब आहे म्हणून ती परत केली. तू माझे पैसे परत कर, असा तगादा लावला. या परप्रांतीय फेरीवाल्याने या तरुणाला उद्देशून ‘मराठी लोक असेच असतात,’ अशी उपरोधिक शब्दात टिपण्णी केली. तरुणाने फेरीवाल्यांना तुम्ही मराठीचा उल्लेख येथे कशासाठी करता. तु मला बोल, असे सांगितले. यावेळी इतर परप्रांतीय फेरीवाले या तरुणाभोवती जमा होऊन हुल्लडबाजी करू लागले. इतर फेरीवाले तरुणाशी वाद घालू लागले. तरुणाने मी मनसैनिकांना बोलवतो, असा इशारा दिला. त्यावेळी तु कोणालाही बोलव जा. ते आमचे काही करणार नाहीत, असा उलट इशारा फेरीवाल्याने दिला. तरुणाने कल्याण पूर्वेतील मनसे शाखेत जाऊन घडला प्रकार तेथे उपस्थित मनसैनिकांना सांगितला. शाखेतील चार ते पाच मनसैनिक तात्काळ रेल्वे स्थानकात आले. त्यांनी हुज्जत घालणाऱ्या फेरीवाल्यांना बेदम चोप दिला. या घटनेनंतर स्कायवॉकवरील इतर फेरीवाले तेथून पळून गेले. काही वेळाने तेथे रेल्वे सुरक्षा बळाचे जवान आले. मनसैनिकांनी फेरीवाल्यांना पोलिसांच्या ताब्यात दिले. या प्रकाराने काही वेळ स्कायवॉकवर तणावाचे वातावरण होते.

## चोरीच्या तक्रारींसाठी केवळ

स्थानकांचा सामावेश आहे.m दरम्यान, कसारा येथे मोबाइल चोरी गेल्यास तक्रारदाराला कल्याण स्थानकात यावे लागते. त्यासाठी त्याला एक तासाचा प्रवास करावा लागतो. शिवाय, तक्रार नोंदविण्यासाठी गर्दी असल्याने पोलीस ठाण्याबाहेर रांगेतही उभे राहावे लागते. असाच प्रकार दादर, कुर्ला, कल्याण आणि ठाणे याठिकाणीही दिसून येतो.आर्थिक भुर्दंड मोबाइल चोरीनंतर त्याचा गैरवापर होण्याची शक्यता असते. यामुळे सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून तसेच नवीन सिमकार्ड घेण्यासाठी चोरीची तक्रार करणे आवश्यक असते. तसेच पाकिटामध्येही एटीएम. ओळखपत्र, वाहन चालविण्याचा परवाना तसेच इतर महत्त्वाची कार्ड असतात. हे चोरीला गेल्यावर ते नवीन मिळविण्यासाठी तक्रारपत्र आवश्यक असते. यामुळे पाकीट किंवा मोबाइल चोरीनंतर अनेक प्रवासी लांबचा प्रवास करत संबंधित स्थानकाबाहेर रांग लावून तक्रारी नोंदवतात. यामुळे शारीरीक, मानसिक त्रासाबरोबरच त्यांचा वेळही वाया जातो. पोलीस ठाण्यात मोबाइल चोरीसंदर्भात गुन्हे दाखल होतात, परंतु त्यांची उकल होण्याचे प्रमाणही वाढले आहे. तसेच आसनगाव, अंबरनाथ, भाईंदर आणि एलटीटी या चार नव्या पोलीस ठाण्याच्या मंजुरीसाठी राज्य शासनाकडे प्रस्ताव सादर झाला आहे. त्यामुळे भविष्यात चार नवी पोलीस ठाणी उपलब्ध होतील.

## सोने तस्करीसाठी अनोखी शक्कल, कॉफी मेकर मशिनमधून आणले दोन कोटी रुपयांचे सोने

नागपूरः सीमाशुल्क विभागाने सोने तस्करीच्या एका धक्कादायक प्रकरणाचा भांडाफोड करत दोन कोटी रुपयांचे सोने जप्त केले आहे. सीमा शुल्क विभागाच्या पथकाने नागपूरच्या (Nagpur) डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळावर ही कारवाई केली आहे. तस्करी करणाऱ्या आरोपीने कॉफी मेकरमधून (Coffee Maker Mashine) दोन कोटी रुपयांचे तब्बल साडे तीन किलो सोने लपवून आणले होते. विभागाने दिलेल्या माहितीनुसार, मोहम्मद अहमद नावाच्या आरोपीने कॉफी मेकर मशिनमध्ये प्रत्येकी 1748 ग्रॅम वजनाचे दोन सोन्याचे गोळे (एकूण वजन 3 किलो 497 ग्राम सोने ) लपवून आणले होते. नागपूर विमानतळावर मोहम्मद अहमद या प्रवशावर संशय आल्याने त्याला थांबवण्यात आले. तो शारजाहून एअर अरेबियाच्या फ्लाइट क्र. G9-415 ने पहाटे 4:10 वाजता नागपूर विमानतळावर आला होता.

# पोलीस बातमी पत्र

महामुंबई

३

मुंबई, मंगळवार ०३ ते ०९ ऑक्टोबर - २०२३


## संपादकीय...



## पुसून टाकण्याचा प्रयत्न होऊनही गांधीविचार शाबूत राहातो...

महात्मा गांधीबद्दल खरा इतिहास सांगण्याऐवजी अलीकडे जाणून बुजून अफवा पसरवण्यात येत आहेत. नवीन पिढी आणि काही प्रौढ वयाचे लोकही अभ्यासाशिवाय पसरवलेल्या (समाजमाध्यमांतून 'फॉरवर्ड' होणाऱ्या) अफवा खऱ्या मानू लागल्याचे लक्षात येते. अशा भाबड्या लोकांसाठी (सत्य) आहे तेच सांगायचे असल्याने हा लेख काही अभ्यासू वाचकांना ढोबळ- साधारण वाटण्याची शक्यता गृहीत आहे, त्याला इलाज नाही. भारतीय स्वातंत्र्य चळवळीत नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी त्यांना 'राष्ट्रपिता' ही पदवी दिली. ४ जून १९४४ रोजी सिंगापूर रेडिओवरील प्रक्षेपणात बोस यांनी गांधींचा उल्लेख 'राष्ट्रपिता' असा केला. गांधीजींच्या आदर्शवाद आणि मजबूत व्यक्तिमत्त्वामुळे भारताला ब्रिटिश राजवटीपासून स्वातंत्र्य मिळण्यास मदत झाली. नंतर ६ जुलै १९४४ रोजी रेडिओ रंगूनवर संदेश प्रसारित करतानाही नेताजींनी गांधींना 'राष्ट्रपिता' म्हणून संबोधले. नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी 'आझाद हिंद सेने'त 'गांधी' आणि 'नेहरू' नावाच्या बटालियन सुरू करून गांधी व नेहरू यांच्या कार्याचा गौरव केला होता. गांधींना 'महात्मा' या नावाने पहिल्यांदा रवींद्रनाथ टागोर यांनी संबोधले. भारताच्या हक्कांचे रक्षण करणे हे आपले कर्तव्य आहे असे गांधी मानत. ब्रिटिशांपासून भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यात महात्मा गांधींनी आयुष्य पणास लावले. भारताबाहेरील अनेक व्यक्ती आणि अनेक देशांत त्यांचा प्रभाव होता, अजूनही आहे. गांधींनी मार्टिन ल्यूथर किंग आणि नेल्सन मंडेला यांच्यावरही प्रभाव टाकला आणि परिणामी अमेरिकेत आफ्रिकन-अमेरिकनांना आता समान अधिकार आहेत, दक्षिण आफ्रिकेत गोऱ्यांनाच राज्यकारभारात स्थान देणारी व्यवस्था आता नामशेष झाली आहे. भारताचे स्वातंत्र्य शांततेने जिंकून गांधीजींनी जगभरातील इतिहासाचा मार्ग बदलला. भारतात दलितांना मानसन्मान मिळावा म्हणून अनेक दृष्टीकोन दिले, स्वतः स्वच्छतेला वाहून घेतले. भारताच्या स्वातंत्र्य संग्रामातील ते प्रमुख नेते आणि तत्त्वज्ञ होते. एक वकील, वसाहतविरोधी राष्ट्रवादी नेते आणि राजकीय नैतिकतावादी होते. शांततेच्या नोबेल पारितोषिकासाठी सलग तीन वर्षे त्यांच्या नावाचा विचार झाला होता पण इंग्रजांच्या विरोधामुळे त्यांना ते दिले गेले नाही. नंतर त्यांच्या काही शिष्यांना नोबेल पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. गांधीजींबद्दल जगप्रसिद्ध विचारवंत आईनस्टाईन म्हणतात, 'महात्मा गांधीजींसारखा हाडामांसाचा असाही माणूस या पृथ्वीवर होऊन गेला, याचे येणाऱ्या पिढीला मोठे अप्रूप वाटेल. त्यांचा विश्वास बसणार नाही.' (हा मनुष्य पंधराव्या शतकात जन्माला आला असता तर आज लोकांनी त्यांना देवाचा अवतार मानले असते.) गांधी यांची तुलना करायची झाली तर भगवान महावीर, गौतम बुद्ध अशा धर्मसंस्थापकांशी करावी लागेल. विसाव्या शतकात सामान्य माणसाप्रमाणे या भूतलावर वावरणारा हा महान मनुष्य ज्यांनी स्वतःच्या डोळ्यांनी पाहिला त्या लोकांना सुदैवी म्हणावे लागेल. गांधींच्या 'माणुसकी'च्या महान शिकवणुकीमुळेच भारताच्या तत्कालीन नेत्यांची नाळ सामान्य माणसाशी जोडली गेली होती. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारताच्या पंतप्रधान पदाची धुरा गांधीवादी नेहरूंसारख्या प्रगल्भ व विज्ञाननिष्ठ नेत्याकडे गेली. म्हणून भारताची धर्मनिरपेक्ष लोकशाही भक्कम होत आजपर्यंत टिकून राहिली. पुढे लालबहादुर शास्त्री, इंदिरा गांधी आदींनी भारताची निधर्मी प्रतिमा यशस्वीरित्या सांभाळली. महात्मा गांधी, नेताजी सुभाषचंद्र बोस, पंडित जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल अशा त्यावेळच्या अनेक नेत्यांना वैयक्तिक महत्त्वाकांक्षा नव्हती. आपले सगळे खासगी जीवन (काहींनी खासगी मालमत्ताही) देशाला अर्पण केले होते. तत्कालीन काही मतभेद असले तरी त्यांनी व्देष पसरवला नाही. मतभेद देशहितासाठी होते हे एकमेकांना ज्ञात होते. गांधींसह भारतीय नेत्यांनी त्यांना स्वतंत्र पाकिस्तान न देता भारताचे पंतप्रधानपद दिले असते तरी पुढे लवकरच भारताचे अनेक तुकडे झाले असते. याचे कारण भारत-पाकिस्तान ब्रिटिशांपासून स्वतंत्र होऊन एक वर्षाच्या आत जिना वारले. त्यांच्या मृत्यूनंतर केवळ द्विराष्ट्रवाद नव्हे तर इथे अनेकराष्ट्रवाद फोफावला असता. उदा. त्यानंतरचे लाल डेंगा, सुभाष घेशींग (पूर्वोत्तर), भिंद्रनवाले (खलिस्तानवादी) आदींचा उल्लेख करता येईल. अशा फुटीरतावादाला आपल्या देशात आजही थारा नाही,

# बचत बारगळ!





संसदेच्या जुन्या भवनातील शेवटचे अधिवेशन, नव्या इमारतीतील पहिले सत्र, महिला आरक्षण विधेयक इत्यादी गत सप्ताहातील दिव्य घटनांत रिझर्व्ह बँकेच्या एका अत्यंत महत्त्वाच्या पाहणीकडे माध्यमांचे आणि त्यामुळे अर्थातच जनसामान्यांचेही दुर्लक्ष झाले. कदाचित असेही असेल की भाषणसंधी देणाऱ्या अनेक तेजःपुंज घटना घडत असल्यामुळे त्यांवर काजळी आणणाऱ्या रिझर्व्ह बँकेच्या निष्कर्षांकडे दुर्लक्षच झालेले बरे, असेही अनेकांस वाटले असेल. ते तसे असेल वा नसेलही. त्या चर्चेत न अडकता रिझर्व्ह बँकेने प्रसृत केलेल्या आकडेवारीची दखल घेणे आवश्यक ठरते. कारण तीवरून आपल्या जगण्याचे अर्थकारण कसे बदलत चालले आहे याचा बोध होतो. रिझर्व्ह बँकेची ही आकडेवारी भारतीयांच्या बचतीत कशी ऐतिहासिक घट झालेली आहे, याचे धक्कादायक तपशील समोर ठेवते. आपल्या संस्कारी मानसिकतेत बचतीस फार महत्त्व. आपली वीज मंडळेही 'विजेची बचत म्हणजे विजेची निर्मिती' अशा प्रकारचे तत्त्वज्ञानामृत ग्राहकांस पाजत असतात. तथापि गेल्या वर्षभरात भारतीयांच्या बचतीचा वेग कमालीचा आटला असून त्याच वेळी कर्जाच्या प्रमाणात मात्र तितकीच कमालीची वाढ झाल्याचे दिसून येते. हा तपशील रिझर्व्ह बँकेनेच प्रसृत केलेला असल्याने त्याच्या विश्वासार्हतेबाबत भक्तमंडळींस संशय घेण्यास जागा नाही. हे स्पष्ट केल्यानंतर आता ही आकडेवारी. भारतीयांच्या बचतीचे गेल्या वर्षीचे प्रमाण हा पाच दशकांतील नीचांक आहे. आपल्या सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या ५.१ टक्के भारतीयांनी बचतीत गुंतवले. गतसाली हे प्रमाण ७.२ टक्के इतके होते. त्याच वेळी भारतीयांच्या कर्जाऊ रकमेचे प्रमाण गतसाली सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या ३.८ टक्के इतके होते. ते आता ५.८ टक्क्यांवर गेल्याचे रिझर्व्ह बँक सांगते. याचा अर्थ सरळ आहे. भारतीयांकडून केली जाणारी बचत आता उतरणीस लागली असून त्याच वेळी त्यांच्यावर रक्कम उसनी घेण्याची वेळ मात्र अधिकाधिक येऊ लागली आहे. अवघ्या तीन वर्षांपूर्वी म्हणजे २०२०-२१ साली बचतीचे प्रमाण ११.५ टक्के इतके होते. ही बचत वित्तीय गुंतवणुकीसाठी वापरली गेली. वित्तीय गुंतवणूक म्हणजे बँकेतील ठेवी, समभाग, विमा इत्यादी. सोनेनाणे, घरदार आदींतील केलेली गुंतवणूक यात धरली जात नाही. ती बिगरवित्तीय गुंतवणूक. याच काळात भारतीयांच्या वित्तीय साधनसंपत्ती मूल्यांतही घट झाल्याचे दिसते. म्हणजे २०२०-२१ साली या संपत्तीचे मोल साधारण २२ लाख कोटी रु. इतके होते. ते २०२२-२३ साली १३ लाख कोटी रुपयांवर घरंगळले. याच काळात नेमकी भारतीयांच्या देण्यांतही वाढ झाल्याचे या आकडेवारीवरून लक्षात येते. ही वाढ तब्बल ७६ टक्के इतकी आहे. गतवर्षी २०२२-२३ साली ही देण्यांची एकूण रक्कम ३६ लाख कोटी रु. इतकी होती. ती २०२३ सालच्या जुलै महिन्यातच ४७ लाख कोटी रुपयांवर जाऊन पोहोचल्याचे दिसते. या वाढीतही एक वेगळा घटक या वेळी ठळकपणे समोर येतो. तो म्हणजे नागरिकांनी बिगरबँक वित्त संस्थांकडून (नॉन बँकिंग फायनान्शिअल कॉर्पोरेशन्स) घेतलेले कर्ज हे बँकांकडून घेतलेल्या कर्जापेक्षा अधिक आहे. पण ही वाढ किती असावी? अजित रानडे यांच्यासारख्या अर्थतज्ज्ञांनी दाखवून दिल्यानुसार ही वाढ तब्बल हजार टक्के इतकी आहे. गेल्या वर्षी म्हणजे २०२१-२२ साली या एनबीएफसीजकडून भारतीयांनी घेतलेली एकूण कर्जे २१०० कोटी रुपयांच्या घरात होती. तथापि २०२२-२३ साली ही रक्कम दोन लाख कोटी रुपयांहून अधिक भरते. यातही धक्कादायक बाब अशी की यातील बहुतेक कर्जे ही घर अथवा मोटार खरेदीसाठीची आहेत. याचा अर्थ आपल्या नागरिकांस बँकांपेक्षा बिगरबँकिंग वित्त संस्था अधिक आकर्षक वाटू लागल्या आहेत, असाही होऊ शकतो. बचतीचा वेग मंदावणे आणि त्याच वेळी कर्जात वाढ होत जाणे हे दोन मुद्दे एकत्रित विचारात घेतल्यास या संकटाचा आकार लक्षात यावा. त्याच वेळी चलनवाढीच्या तुलनेत सरासरी वेतनात तितकीशी वाढ न होणे हे या संकटाचे गांभीर्य वाढवते. याचे कारण आपण अमेरिकेप्रमाणे नाही. सामान्य अमेरिकी नागरिक कमावतो त्यापेक्षा अधिक खर्च करतो. ती त्यांची राष्ट्रीय सवय आहे. त्यामुळे त्या देशाच्या डोक्यावरील कर्ज सर्वाधिक भरते. आपले असे नाही. 'अंथरूण पाहून पाय पसरावेत' अशा प्रकारची शिकवण पिढ्यानपिढ्या दिली गेल्याने सर्वसामान्य भारतीय नागरिक उधळपट्टी करीत नाही. जे काही कमावतो त्यातील काही ना काही उद्यासाठी ठेवतो. हे बचतीचे आपले प्रमाण अलीकडेपर्यंत सातत्याने वाढतेच राहिलेले आहे. सुमारे सहा दशकांपूर्वी भारतीयांची सरासरी बचत दहा टक्क्यांपेक्षाही कमी होती. उत्तरोत्तर ती वाढत गेली आणि २०१०च्या दशकात ती ३७ टक्क्यांवर जाऊन पोहोचली. हा उच्चांक. म्हणजे प्रत्येक शंभर रुपयांतील ३७ रुपये भारतीय उद्यासाठी वेगळे काढून ठेवत होता. याचाच दुसरा अर्थ असा की त्याआधीची काही वर्षे भारतीय अर्थव्यवस्थेने उत्तम गती घेतल्याने भारतीयाचे सरासरीउत्पन्न वाढले आणि त्यामुळे त्याच्या सरासरी बचतीतही लक्षणीय वाढ झाली. ही बाब लक्षात घेणे अत्यंत महत्त्वाचे.

कारण त्यातून देशाच्या अर्थव्यवस्थेची गती आणि नागरिकांची बचत क्षमता यांचा थेट संबंध दिसून येतो. अर्थव्यवस्था वाढत असेल तर नागरिकांचे उत्पन्न वाढते आणि त्यामुळे त्यांच्या बचतीचा आकारही वाढतो. याच विधानाचा व्यत्यासही तितकाच खरा आहे. म्हणजे ज्या वेळी नागरिक अधिकाधिक बचत करत असतात त्या वेळी अर्थव्यवस्था अधिकाधिक विकास नोंदवते. आपल्याकडे चीनसारखे नाही. त्या देशात बचतीची सक्ती सरकार करू शकते. त्यामुळे बँका आदींत निधीसंचय होत राहातो आणि तो पैसा सरकारला विकासकामांत, भांडवलवृद्धीत वापरता येतो. याचाही दुष्परिणाम होत नाही असे नाही. तो होतो नागरिकांची क्रयशक्ती कमी होण्यात. हातातच जर पुरेसा पैसा राहात नसेल तर वरखर्चासाठी शिल्लक तरी काय राहणार? म्हणजे त्याचाही पुन्हा अर्थव्यवस्थेस फटका! अशा वेळी नैसर्गिक पद्धतीने नागरिक जर बचत करत असतील तर ते केव्हाही स्वागतार्ह. आपल्याकडे हे होत होते. त्यामुळे भारत हा बचत करणाऱ्यांचा देश म्हणून ओळखला जात असे. तथापि २०१६ नंतर विविध आर्थिक धक्क्यांमुळे भारतीयांस बचतीत हात आखडता घ्यावा लागू लागला. निश्चलनीकरण, नंतर अर्धामुर्धा वस्तू-सेवा कर आणि या सगळ्यावर २०२० सालचा कोविड फेरा यामुळे भारतीयांची विवंचना मोठ्या प्रमाणावर वाढू लागली. या कटू वास्तवाचे दृश्य रूप म्हणजे नागरिकांच्या बचतीत झालेली लक्षणीय कपात. सध्याचे बचतीचे प्रमाण हे गेल्या पन्नासहून अधिक वर्षांतील नीचांक हे अधिकृत आकडेवारीवरूनच स्पष्ट होत असेल तर परिस्थिती गंभीर आहे हे अमान्य करता येणे अवघड. तरीही केंद्रीय अर्थ मंत्रालयाने घरखरेदी, वाहनखरेदी आदींमध्ये लोक पैसा गुंतवताहेत असे सांगून हा तपशील नाकारण्याचा प्रयत्न केला. पण बिगरबँकिंग वित्तीय संस्थांच्या कर्जातील वाढ सरकारनेही नाकारलेली नाही. कारण हे वास्तव हा राजकीय अभिनिवेशाचा विषय नाही. बचत आणि उत्पादकता, अर्थगती यांचा थेट संबंध असतो हे सामान्यज्ञान! आजची बचत ही उद्याचा पाया, हे भारतीय जाणतात. म्हणून नागरिकांच्या बचतीस अधिकाधिक उत्तेजन मिळेल अशी धोरणआखणी करणे गरजेचे आहे. तसे करणे म्हणजेच अर्थव्यवस्थेस चालना देणे. त्यावर लक्ष केंद्रित हवे. नागरिकांची ही अशी बचत बारगळ सुरू राहणे अंतिमतः धोक्याचे ठरेल.





# गणरायाला भावपूर्ण निरोप

## लालबागच्या राजाची तब्बल २३ तास मिरवणूक

## ३९,७५८ गणेशमूर्तींचे झाले विसर्जन

## भाविकांच्या आनंदाला उधाण

मुखी एकच जयघोष...'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या...' सर्वत्र ढोल-ताशांचा गजर, लेझीम आणि झांज पथकांचा झंकार अशा मंगलमय वातावरणात अनंत चतुर्दशीला दहा दिवसांच्या 'बाप्पा'ला गणेशभक्तांनी निरोप दिला. सकाळपासून मिरवणुकीने निघालेल्या अनेक गणपती बाप्पांचे शुक्रवारी पहाटे विसर्जन करण्यात आले. लालबागच्या राजाला तब्बल २३ तासांच्या मिरवणुकीने अलोट गर्दीत निरोप देण्यात आला. अनंत चतुर्दशीला सार्वजनिक ६ हजार ९५१ तसेच घरगुती ३२ हजार ३४५ एकूण ३९,७५८ गणेशमूर्तींसह गौरींचे विसर्जन करण्यात आले. यामध्ये कृत्रिम तलावांत सार्वजनिक ७४०, घरगुती १०,२०७ गणेशमूर्ती व गौरींचे विसर्जन करण्यात आले.

मागील १० दिवस येथेच्छ आपल्या लाडक्या गणपतीची सेवा केल्यानंतर काल शुक्रवारी गणपती बाप्पाला अत्यंत भक्तिमय वातावरणात निरोप देण्यात आला. घरगुती गणेशाचे सकाळी ९ वाजल्यापासूनच, तर सार्वजनिक गणपतींचे ढोल-ताशांच्या गजरात, गुलाल उधळीत, बाप्पांचा जयजयकार करीत विसर्जन मिरवणुकांना सुरुवात झाली. मुंबईतील रस्ते मिरवणुकांनी फुलून गेले होते. गुरुवारी सकाळी ११.३० वाजता लालबागच्या राजाची अलोट गर्दीच्या साक्षीने मिरवणूक निघाली. लालबागच्या राजाला निरोप देण्यासाठी मुंबईकरांनी प्रचंड गर्दी केली होती. गल्ल्या, चाळी, रस्ते, चौक गर्दीने भरून गेले होते. गणेश विसर्जनाच्या आदल्या दिवशीच पावसाने जोरदार हजेरी लावली होती. विसर्जनाच्या दिवशीही पावसाची रिपरिप सुरू राहिली, तरीही भाविकांचा उत्साह कायम होता. गणेश गल्लीतील मुंबईचा राजा, लालबागचा राजा, तेजुकायाचा बाप्पा, चिंचपोकळीचा चिंतामणी, रंगारी बदक चाळीचा गणपती आदी गणपतींना निरोप देण्यासाठी लालबाग परळ, चिंचपोकळी, भायखळा, उमरखाडी सी पी टॅंक परिसरात मोठा जनसमुदाय उसळला होता.

बाप्पाचे रूप डोळ्यांत साठवण्यासाठी पावसाची तमा न बाळगता सर्वचजण रस्त्याच्या दुतर्फा उभे होते. इमारतीच्या गच्चीवर व बाल्कनीतून बाप्पावर फुलांचा वर्षाव सुरू होता. तसेच ठिकठिकाणी नोटांच्या माळा, तसेच गिरगाव चौपाटीसह मुंबईच्या सहा चौपाट्यांवर घरगुती आणि सार्वजनिक गणपतींच्या विसर्जनासाठी जनसागर उसळला होता. गिरगाव चौपाटीजवळ गिरगावचा राजा, गिरणगावचा राजा, काळाचौकीचा महाराजा, चंदनवाडीचा राजा, खेतवाडीचा महाराजा या प्रसिद्ध मंडळांच्या गणेशमूर्ती पाहण्यासाठी लोकांची मोठी गर्दी झाली हाती. मुंबईतील चौपाट्यांवर संध्याकाळी पावसाच्या सरीत वाजत-गाजत बाप्पाच्या विसर्जनाची मिरवणूक सुरू होती. ठिकठिकाणाहून निघालेल्या मिरवणुकांमुळे वाहतूक कोंडी होऊ नये, यासाठी अनेक रस्ते वाहतुकीसाठी बंद करून वाहतूक वळवण्यात आली होती. भाविकांना विसर्जनस्थळी कोणतीही अडचण येऊ नये यासाठी मुंबई पालिकेच्या वतीने सोयी-सुविधा उपलब्ध करून दिल्या होत्या. कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलीस दलातर्फे चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. मिरवणुकीत सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची व्यवस्था करण्यात आली होती. गिरगाव, दादर आणि जुहू चौपाटीवर जनसागर लोटला होता. मुंबई महापालिकेने विसर्जनाचे ऑनलाइन थेट प्रक्षेपण उपलब्ध केले होते. त्यामुळे अनेकांना घरबसल्या विसर्जन पाहता आले. लालबागच्या राजाचे तब्बल २३ तासांच्या मिरवणुकीने शुक्रवारी दुसऱ्या दिवशी ९.३० वाजता विसर्जन करण्यात आले. मनपा, पोलीस दल आणि इतर यंत्रणांनी चांगल्या प्रकारे नियोजन केल्याने कोणताही अनुचित प्रकार न घडता विसर्जन शांततेत व भावपूर्ण वातावरणात पार पडले.

### कृत्रिम तलावांमध्ये ७२ हजार २४० घरगुती मूर्तींचे विसर्जन

- मुंबईतील गणेशोत्सवात यंदा दहा दिवसांच्या कालावधीमध्ये एकूण २ लाख ५ हजार ७२२ गणेशमूर्तींचे विसर्जन झाले. पैकी ७६ हजार ७०९ मूर्ती कृत्रिम तलावांमध्ये विसर्जित करण्यात आल्या. यामध्ये घरगुती ७२ हजार २४० गणेशमूर्तींचा समावेश आहे. कृत्रिम विसर्जन स्थळावर मूर्ती विसर्जित करण्याचा ओघ यंदा वाढला आहे. एवढेच नव्हे, तर नैसर्गिक आणि कृत्रिम विसर्जनस्थळ मिळून एकूण ५०० मेट्रिक टन निर्माल्य संकलन करण्यात आले.
- गणेशमूर्ती विसर्जनासाठी पालिकेकडून विशेष तयारी करण्यात आली होती. पालिकेचे सुमारे १० हजार कर्मचारी, ७१ नियंत्रण कक्ष तसेच अन्य विविध सोयी-सुविधांसह उत्तम सेवा मुंबईतील नागरिकांसाठी उपलब्ध करून दिली. पर्यावरणपूरक गणेशोत्सवाला चालना देण्याच्या दृष्टीने यंदा मूर्ती विसर्जनासाठी ६९ नैसर्गिक स्थळांसह एकूण २०० कृत्रिम विसर्जनस्थळांवर देखील मूर्ती विसर्जन व्यवस्था केली होती.
- सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनीही यंदा कृत्रिम तलावांना पसंती दिली होती. एकूण १ हजार ९०४ गणेशोत्सव मंडळांनी कृत्रिम तलावांत मूर्तीचे विसर्जन केले. घरगुती मूर्तींमध्ये यंदा सर्वाधिक अशा ७२ हजार २४० मूर्तींचे, तर २ हजार ५६५ हरतालिका आणि गौरींचे विसर्जन कृत्रिम तलावांच्या ठिकाणी विसर्जन करण्यात आले.

### विसर्जनादरम्यान जुहू चौपाटी येथे एकाचा बुडून मृत्यू

**मुंबई** : जुहू चौपाटी येथे गुरुवारी गणपती विसर्जनासाठी गेलेल्या हसन युसूफ शेख (१६) याचा बुडून मृत्यू झाल्याची घटना घडली. त्यामुळे शांततेत सुरू असलेल्या विसर्जनाला गालबोट लागले.

### पुण्याच्या विसर्जनाची मिरवणूक

**२८ तास ४० मिनिटे पुणे** : पुण्याच्या गणपती विसर्जन मिरवणुकीची तब्बल २८ तास ४० मिनिटांनी सांगता झाली. महाराष्ट्र तरुण मंडळाचा गणपती टिळक चौकातून शुक्रवारी दुपारी ३ वाजून १० मिनिटांनी मार्गस्थ झाला. मानाचा पहिला कसबा गणपतीची पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते आरती करून गुरुवारी सकाळी १०.३० वाजता विसर्जन मिरवणुकीला सुरुवात झाली.


### गणेश विसर्जनासाठी गेलेले चार

**जण नदीत बुडाले** : गणेश विसर्जनासाठी गेलेले चार जण उल्हास नदीत बुडाल्याची घटना कर्जत तालुक्यातील चांदई येथे घडली. यामध्ये एका १२ वर्षीय मुलाला वाचवण्यात यश आले असून स्थानिकांनी एकाचा मृतदेह पाण्याबाहेर काढला. दोघा जणांचा पाण्यात शोध घेत असताना अंधार झाल्याने खोपोली येथील गुरुनाथ साठेलकर यांच्या अपघातग्रस्त सामाजिक टीमने शोध मोहीम थांबवली.

# सासूने घरात येण्यास मज्जाव केल्यानं पतीकडून पत्नीची हत्या, सासूवर हातोडीनं हल्ला

ठाणे : विजय उर्फ समीर कमलनाथ मिश्रा याचं लग्न 14 वर्षापूर्वी झालं होतं. त्यानंतर त्याने मुस्लिम धर्म स्वीकारला होता. तसंच तो पत्नीपासून विभक्त राहत होता. घटनेच्या दिवशी तो पत्नी जरीन हिला भेटण्यासाठी आला होता. परंतु त्याला घरात घेतल्यानं राग अनावर झालेल्या विजय उर्फ समीर याने हातोडीनं पत्नी जरीन हिच्या डोक्यावर प्रहार करून तिची हत्या केली. तर वाद सोडविण्यासाठी आलेल्या सासुवर हल्ला करून जखमी केल्याची घटना मुंब्रा येथील अंबेडकर नगर येथे घडलीय. मुंब्रा पोलिसांनी आरोपी विजय उर्फ समीर याला अटक केली. त्याच्या विरोधात खून आणि खूनीहल्ला प्रमाणे गुन्हा दाखल केलेला आहे.

कौटुंबिक वाद : अटक आरोपी विजय उर्फ समीर कमलनाथ मिश्रा आणि जरीन अंसारी (30) यांचा 14 वर्षापूर्वी विवाह झाला होता. आरोपीनं मुस्लिम धर्म स्वीकारला होता. आरोपी विजय उर्फ समीर कमलनाथ मिश्रा हा भिवंडी काल्हेर येथील रहिवाशी आहे. विवाहानंतर दोघांना एक मुलगा आणि एक मुलगी अशी अपत्य आहेत. कौटुंबिक वादातून आरोपी विजय उर्फ समीर याचे आणि पत्नी जरीन याचा कौटुंबिक वाद झाला. त्यामुळे दोघे



विभक्त राहत होते.सासूने दिला घरात घेण्यास नकार : आरोपी विजय उर्फ समीर हा काल्हेर भिवंडी आणि पत्नी जरीन ही आपल्या आईकडे मुंब्रा आंबेडकर नगर येथे आई, दोन मुले यांच्यासोबत राहत होती. दरम्यान गुरुवारी दुपारी आरोपी विजय उर्फ समीर हा पत्नीला भेटण्यासाठी मुंब्रा आंबेडकर नगर येथील घरात गेला. मात्र, घरातील मृतक जरीन हिच्या आईनं मात्र विजय उर्फ समीर याला घरात घेण्यास नकार दिला. यावरून वाद झाला. तर रागाच्या भरात आरोपी विजय हा बांधकाम साइटवर काम करीत होता.

हातोड्यानं हल्ला : सासूनं घरात घेण्यासाठी नकार देताच आरोपी विजय आणि समीर याने हातोड्यानं जरीनच्या डोक्यात प्रहार केला. ती रक्तबंबाळ झाली. तिला सोडविण्यासाठी सरसावलेल्या मोठ्या मुलीवर आणि सासुवर हातोड्यानं हल्ला करून त्याने दोघींना जखमी केले. दरम्यान गंभीर जखमी जरीनला रुग्णालयात नेले असतं तिचा मृत्यू झालाय. हा आरडाओरड एकूण आसपासचे लोकं वाद सोडविण्यासाठी पुढे आले. त्यानंतर आरोपी विजय उर्फ समीरनं लोकांना तीन सेल टेपद्वारे एकत्र करून बॉम्ब सदृश्य वस्तु दाखवली. बॉबस्फोट करीन, अशी धमकी दिल्यानं स्थानिकांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालंय. पोलिसांनी तात्काळ कारवाई केलीय.

जीवघेणा हल्ला आणि हत्या : घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी मुंब्रा पोलिसांनी पोहचून आरोपी विजय उर्फ समीर याला अटक केलीय. त्याच्या विरोधात जीवघेणा हल्ला आणि हत्या प्रकरणी गुन्हा दाखल करून अटक केली. जरीन हिचा मृतदेह हा शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आला.

## हरवले आहेत



**नाव:** नागनाथ कालिगम ईपतवार

**वय :** ७० वर्षे

**वर्णन :** रंग सावळा, पिवळ्या रंगाचे टीशर्ट व मागच्या बाजूला "भक्तिवेदांता हॉस्पिटल" चे नाव आहे

हे मीरा रोड येथून मंगळवार दि १९/०९/२०२३ सांध्यकाली ५ वाजता बेपत्ता झालेले आहेत,

कोणाच्या निदर्शनास अशी व्यक्ती आल्यास कृपया खलील नंबर वर संपर्क करा.

**संपर्क :** 8879936253 / 9321996831 / 8275196230

## बलुचिस्तानमध्ये बॉम्बस्फोट, ५२ जणांचा मृत्यू, १३० जण जखमी

**इस्लामाबाद :** काल सर्वत्र ईद-ए-मिलाद-उन-नबीचा सण सर्वत्र साजरा होत असताना पाकिस्तानमध्ये मिरवणुकीसाठी लोक जमले, त्यावेळी पाकच्या बलुचिस्तानमधील मशिदीजवळ शुक्रवारी आत्मघाती हल्ला झाला. त्यात ५२ जणांचा मृत्यू झाला, तर १३० जण जखमी झाले. मृतांमध्ये एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याचाही समावेश आहे.

## निलंबित पोलीस अधिकारी सचिन वाझेंना जामीन मंजूर

**मुंबई :** सीबीआय तपास करत असलेल्या खंडणी प्रकरणात निलंबित पोलीस अधिकारी सचिन वाझेंना जामीन मंजूर झाला आहे. बिमल अग्रवाल नावाच्या व्यापाऱ्याच्या तक्रारीवरून वाझे आणि इतरांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. सत्र न्यायालयात शुक्रवारी जामीन मंजूर झाला असला तरी वाझे तुरुंगातच राहणार आहे. व्यापारी अग्रवाल यांनी केलेल्या तक्रारी मध्ये आरोप केला होता की कोविड काळात वाझे आणि काही लोकांनी हॉटेल चालविण्यासाठी त्यांच्याकडून खंडणी मागितली होती.

### आमदार नितेश राणे यांचे जोरदार प्रत्युत्तर

## पत्राचाळमध्ये मराठी माणसे राहत नव्हती का?

मुलुंड पश्चिमेकडील एका सोसायटीत मराठी असल्याच्या कारणावरून तृप्ती देवरुखकर या महिलेला ऑफिससाठी जागा नाकारण्यात आली होती. हा प्रकार समोर येताच यावरून राजकीय आरोप-प्रत्यारोप सु रू झाले आहेत. उबाठाचे खासदार संजय राऊत यांनी शिंदे सरकारला जबाबदार धरताच भाजप आमदार निते श राणे यांनी पत्राचाळमध्ये काय मराठी माणसे राहत नव्हती? असा सवाल करत राऊतांना जोरदार प्रत्युत्तर दिले आहे.



मराठी असल्याच्या कारणावरून तृप्ती दे वरुखकर यांना ऑफिससाठी जागा नाकारण्यात आल्याने त्यांनी सोशल मीडियावर व्हीडिओ शे अर करत त्यांच्यावरील अन्यायाला वाचा फोडली होती. या घटनेला राजकीय वळण मिळाले आहे. उबाठा गटाचे खासदार सं जय राऊत यांनी या घटनेला भाजप आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना जबाबदार असल्याचा आरोप के ला आहे. या आरोपांना भाजप आमदार नितेश राणे यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले आहे.

नितेश राणे म्हणाले, मुलुंड घटनेला भाजप आणि शिंदे जबाबदार आहेत, असे बोलण्याअगोदर सं जय राऊत यांना लाज वाटली पाहिजे. मुंबईतला मराठी माणसाचा टक्का का घसरला? इतकी वर्षे महापालिकेत उद्धव ठाकरे यांची सत्ता होती ना? मग तरीही मु ंबईतला मराठी माणूस आज मीरा रोड, वसई, विरार, भाईंदर, कल्याण, डोंबिवली या ठिकाणी का राहायला गेला? मुंबईमध्ये त्यांना का घर घ्यावेसे वाटले नाही? का त्याला आर्थिक सक्षम के ले नाही? का वडापावच्या गाडीपुरते ठे वले? असे प्रश्न उपस्थित करत नितेश राणे यांनी संजय राऊतांचा समाचार घेतला.

पुढे नितेश राणे म्हणाले, पत्राचाळमध्ये काय मराठी माणसे राहत नव्हती? खं बाटा आणि एअर इंडियामध्ये मराठी कामगार काम करत नव्हते का? मग त्याला जबाबदार कोण आहे? स्वतःच्या अंगावर मराठी माणसाच्या भविष्याचा खून करून बरबटलेले जे रक्त आहे, ते आधी पुसा आणि मग भाजप आणि शिंदे साहेबांवर बोट ठे वा, असा हल्लाबोल नितेश राणे यांनी केला.

## क्यूआर कोडशिवाय प्रकल्पांच्या जाहिरातींची १०७ प्रकरणे महारेराच्या निदर्शनास

### ७४ विकासकांना कारणे दाखवा, ६ प्रकरणांत २ लाखांचा दंड

गृहनिर्माण प्रकल्पांच्या जाहिरातींमध्ये क्यूआर कोड न छापणारी राज्यातील १०७ प्रकरणे महारेराच्या निदर्शनास आली आहेत. यातील ७४ विकासकांना महारेराने कारणे दाखवा नोटिसा बजावल्या आहेत. यापैकी २५ प्रकरणी सुनावणी झाली असू न ६ प्रकरणांत एकूण २ लाखांचा दं ड ठोठावण्यात आला आहे.

महारेराने १ ऑगस्टपासून गृहनिर्माण प्रकल्पांच्या सर्व प्रकारच्या जाहिरातींसोबत क्यू आर कोड छापणे बंधनकारक केलेले आहे. महारेरा वर्तमानपत्रांतील जाहिरातींशिवाय ऑनलाइन, फे सबुक, ट्विटर, इं स्टाग्राम इत्यादी समाज माध्यमांवरील जाहिरातींवरही लक्ष ठेवून आहे. ऑनलाइन आणि फेसबुकवरील जाहिरातींमध्ये क्यूआर कोड न वापरण्याचे प्रमाण लक्षणीय असल्याचे आढळून आले आहे. याशिवाय ऑनलाइन आणि फेसबुकवरील जाहिरातींच्या आनुषंगाने दिलेल्या नोटिसेसला उत्तर देताना, अशा जाहिराती त्यांनी दिल्या नाही, अशी भूमिका काही विकासकांनी घेतली आहे. त्यांच्या परवानगीशिवाय अशा जाहिराती करणाऱ्यांविरुद्ध सायबर क्राईम यंत्रणेकडे गु न्हे नोंदविण्याचे निर्दे श या विकासकांना देण्यात आले आहेत.

### ते म्हणतात ‘भारत वाढती आर्थिक शक्ती...’

## भारताच्या कडक भूमिकेमुळे कॅनडाचे पंतप्रधान नरमले

भारत आणि कॅ नडा याच्यात काही दिवसांपासून वाद निर्माण झाले असून या वादात भारताने कॅनडाला जशास तसे प्रत्युत्तर दिल्यामुळे भारताच्या कडक भू मिकेनंतर आता कॅ नडाचे सूर बदलले आहेत. भारत ही वाढती आर्थिक शक्ती आहे. त्यामुळे त्याकडे दुर्लक्ष करता येणार नाही, असे कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रुडो यांनी म्हटले आहे.

ते म्हणाले, कॅनडा भारतासोबतचे संबंध मजबूत करण्यासाठी प्रयत्नशील आहे. भारत ही वाढती आर्थिक शक्ती असल्याचे पं तप्रधान ट्रुडो यांनी मान्य के ले. 'कॅनडा आणि त्याच्या मित्र राष्ट्रांसाठी भारतासोबतचे सं बंध मजबूत करणे खूप महत्त्वाचे असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. जगाच्या विविध व्यासपीठांवरही भारताला महत्त्व दिले जात आहे. भारतासोबतचे संबंध



दृढ करण्याबाबत आम्ही खू प गं भीर आहोत. सागरी धोरणासाठीही भारत महत्त्वाचा आहे असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावर्षी जूनमध्ये खलिस्तानी दहशतवादी हरदीप सिं ह निज्जरची कॅनडात हत्या झाली. निज्जरच्या हत्येत भारतीय एजंटचा हात असल्याचा आरोप कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रूडो यांनी अलीकडेच तेथील संसदेत केला होता. त्यांच्या सरकारला निज्जरच्या हत्येत भारतीय एजंटचा हात असल्याची गुप्त माहिती मिळाली असल्याचे त्यांचे म्हणणे होते. पं तप्रधान ट्रुडो यांच्या या आरोपानंतर दोन्ही दे शांमधील संबंध ताणले गे ले आणि भारताने ट्रुडो यांचे वक्तव्य बेताल ठरवू न फेटाळून लावले. यानंतर कॅ नडाने एका भारतीय राजदूताची तेथून हकालपट्टी केली होती. त्याला भारतानेही प्रत्युत्तर दे त कॅ नडाच्या राजदूताची भारतातून हकालपट्टी केली. याशिवाय भारताने कॅ नडाच्या नागरिकांना व्हिसा दे ण्यावरही बं दी घातली. भारताने कॅनडाविरुद्धच्या कडक भूमिकेनंतर कॅनडा आता नरमल्याचे दिसत आहे.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनानुसार रविवारी देशभरात ‘स्वच्छता हीच सेवा’ मोहीम राबविण्यात आली. पंतप्रधान मोदींनी कुस्तीपटू अंकित बैयनपुरिया यांच्यासोबत मोहिमेत सहभाग नोंदविला, तर मुंबई महापालिकेतर्फे जुहू चौपाटीवर राबविण्यात आलेल्या स्वच्छता मोहिमेत केंद्रीय सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योग मंत्री नारायण राणे आणि ज्येष्ठ अभिनेते सुरेश आबेरॉय हे सहभागी झाले होते. तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गिरगाव चौपाटीवर स्वच्छता मोहिमेत सहभाग घेतला.

### आशियाई क्रीडा स्पर्धा



## स्टीपलचेसमध्ये अविनाश साबळेचे ‘सुवर्ण यश’

**होंगझाऊ :** चीनमध्ये सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेतील ॲथलेटिक्स प्रकारांना सुरुवात झाली असून ॲथलेटिक्समधील ३००० मीटर स्टीपलचेस (अडथळ्यांची शर्यत) स्पर्धेत भारताच्या अविनाश साबळेने सुवर्णपदक जिंकत इतिहास रचला आहे. त्याने यावेळी आशियाई रेकॉर्ड देखील मोडला आहे. बुडापेस्ट वर्ल्ड चॅम्पियनशिपमधील आपल्या स्ट्रॅटेजीच्या विपरित, साबळेने स्वतःमध्ये आणि उर्वरित खेळाडूंमध्ये अंतर निर्माण करण्यासाठी पुढे धाव घेतली आणि मोठ्या अंतराने शर्यत जिंकली.

# स्वस्थ - स्वच्छ भारतासाठीची मोहीम

## पंतप्रधान मोदींनी दिला स्वच्छतेचा मंत्र

महात्मा गां धी जयंतीच्या एक दिवस आधी, म्हणजेच सोमवारी १ऑक्टोबरला देशभरात ‘स्वच्छता हीच से वा’ ही मोहीम मोठ्या उत्साहात राबविण्यात आली. या मोहिमेत सहभागी होण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी भारतीयांना आवाहन के ले होते. तसे च या दिवशी पंतप्रधान मोदी यांनी अंकित बैयनपुरिया या फिटनेस इन्फ्लुएन्सरसोबत मोहिमेत सहभाग नोंदविला आहे. ७५ हार्ड चॅलेंजमुळे जगभरात प्रसिद्ध झालेल्या अंकितसोबतचा व्हीडिओ पोस्ट करून मोदींनी त्याचे कौतुक केले.

‘आज, जेव्हा देश स्वच्छतेवर लक्ष केंद्रित करत आहे, तेव्हा अंकित बै यनपुरिया आणि मी सु द्धा यात सहभागी होत आहोत. फक्त स्वच्छतेच्या पलीकडे, आम्ही शारीरिक व मानसिक तं दरुस्तीला सु द्धा यात महत्त्वाचे स्थान देत आहोत. ही स्वस्थ व स्वच्छ भारतासाठीची मोहीम आहे’, असे पंतप्रधान मोदींनी सांगितले.

सप्टेंबरच्या ‘मन की बात’ कार्यक्रमात पंतप्रधान मोदी यांनी २ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजल्यापासून एक तास स्वच्छतेसाठी श्रमदान करण्याचे आवाहन केले होते. यावेळी त्यांनी ‘१ तारीख, १ तास, एक साथ' असा नारा दिला होता. श्रमदानासाठी पंतप्रधान मोदींनी देशवासीयांना आवाहन केले होते. यावेळी ते म्हणाले ‘स्वच्छ भारत ही एक सामायिक जबाबदारी आहे आणि प्रत्येक प्रयत्न महत्त्वाचा आहे. आजच्या मोहिमेसाठी देशभरातील ६.४ लाख ठिकाणे निवडण्यात आली आहेत.

या व्हीडिओमध्ये पं तप्रधान मोदी आणि अं कितला यांचे सं वाद आहे त. स्वच्छता मिशनमुळे फिटनेसला कशी मदत झाली, असे मोदी हे अंकितला विचारतात. त्यावर अं कित उत्तर दे तो, ‘आपला परिसर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी आपली आहे. जर आपल्या सभोवतालचा परिसर स्वच्छ राहिला तरच आपण तं दुरुस्त राहू . सोनीपतच्या लोकांनी स्वच्छतेवर लक्ष केंद्रित करायला सु रुवात के ली आहे, असेही अं कित म्हणाला. नरें द्र मोदी यांनी अं कितला त्याच्या ७५ डे हार्ड चॅलेंजविषयी सु द्धा माहिती विचारली होती. ज्यावर उत्तर दे ताना अं कितने आपले ७५ हार्ड डे चॅ लेंज सविस्तर उलगडून सांगितले होते. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीच्या पार्श्वभूमीवर रविवारी देशभरात स्वच्छता मोहीम राबवली गेली.

भाजप अध्यक्ष जेपी नड्डा, गृ हमंत्री अमित शाह यांच्यासह अने क दिग्गज नेत्यांनीही स्वच्छता मोहिमेला हातभार लावून देशवासियांना स्वच्छतेचा संदेश दिला आहे. एक तारीख, एक तास, एक साथ सप्टेंबरच्या ‘मन की बात’ कार्यक्रमात पंतप्रधान मोदी यांनी श्रमदान करण्याचे आवाहन केले होते.

### स्वच्छता कागदावर नको, दिसली पाहिजे : मुख्यमंत्री

**मूंबई :** महात्मा गांधी जयंतीचे औचित्य साधून, केंद्र सरकारने स्वच्छता हीच सेवा मोहीम राबवण्याचा निर्णय घेतला. याच पार्श्वभूमीवर राज्यासह देशभरात ‘स्वच्छता हीच सेवा’ उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गिरगाव चौपाटीवर स्वच्छता केली. तर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिवडी किल्ल्यावर, तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बारामतीत स्वच्छता सेवा अभियानात सहभाग घेतला. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी अहमदाबादेत सहभाग घेतला. दरम्यान, ‘स्वच्छता हीच सेवा’ मोहिमेंतर्गत राज्यात ‘एक तारीख एक तास’ मोहिमेला अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला असून ७२ हजारांपेक्षा जास्त ठिकाणी स्वच्छेतेची माहीम राबवण्यात आली.

### आमदार नितेश राणे यांचा आदित्य ठाकरेंना इशारा

## आमच्या नेत्यांवर आरोप केल्यास वस्त्रहरण करू

‘उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा विदेश दौरा तसे च उद्योग मंत्र्यांवर आमदार आदित्य ठाकरे हे टीका करत आहेत. आमच्या नेत्यांवर पुन्हा टीका केल्यास तुमचे वस्त्रहरण करू’, असा थे ट इशारा भाजप आमदार निते श राणे यांनी आदित्य ठाकरे यांना रविवारी पत्रकार परिषदेत दिला.

‘आमदार आदित्य ठाकरेंचे कालपासून पु न्हा म्याव... म्याव... सुरू झाले ले आहे. पत्रकार परिषद घेऊन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा दौरा, उद्योग मं त्री यांच्यावर त्यांनी टीका के ली आहे. विदेश दौऱ्यावर कु णी टीका करावी तर ज्यांनी आयुष्यामध्ये एकही परदेश दौरा स्वतःच्या पैशाने केलेला नाही. प्रत्येक परदेश दौऱ्यावर साधे खाण्याचे बिल स्वतः दिलेले नाही. ज्या घरामध्ये राहतात त्याचे एसी देखील फुकट लावलेले आहेत. जी गाडी हे चालवतात ती पण एका आमदाराच्या मे डिकल कॉलेजच्या नावे आहे. जे आय वॉच, आय फोन हे वापरतात, ते ही कुणी दु सऱ्याने दिले आहेत. ज्यांनी आयुष्य दुसऱ्यांच्या पैशांवर काढले. स्वतःच्या खिशात हात टाकणे हे उद्धव ठाकरे यांच्या कुं डलीमध्येच नाही किं वा त्यांना जमतच नाही. अशा लोकांनी दे वेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री आणि उद्योगमंत्र्यांच्या परदेश दौऱ्यावर बोलताना आदित्य ठाकरे यांना लाज वाटायला हवी होती’, असा हल्लाबोल आ. निते श राणे यांनी केला.

‘महाविकास आघाडीचे सरकार असताना हे मं त्री म्हणून दाओसला गेले होते. तिथे ने मके काय झाले याची माहिती आम्ही जाहीर करू काय?’, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला. ‘आम्हाला तु मचा खरा कार्यक्रम माहीत असून आवाज सु धारण्यासाठी ने मकी कु ठे ट्रीटमेंट घे तली, त्यासाठी शासकीय पैसा कसा वापरला गे ला. कु ठल्या कोकिळेसोबत गाणे गात होतात. याची सगळी माहिती आमच्याकडे आहे. पण कुणाच्या खासगी आयुष्याबद्दल बोलणे हे आमच्या पक्षाच्या चौकटीत बसत नाही. पुन्हा देवेंद्र फडणवीस यांच्यावर आरोप केले तर तु मच्या दाओस दौऱ्याची खरी माहिती जाहीर करू आणि तुमचे वस्त्रहरण के ल्याशिवाय गप्प बसणार नाही’, असाही इशारा त्यांनी दिला. आदित्य यांचा खरा राग हा मु ख्यमंत्री शिं दे किं वा सरकार नाही. तर दोन्ही भावांमध्ये सु रू झालेली स्पर्धा हा आहे. आदित्य ठाकरे यांना पुन्हा पुन्हा लॉन्च केल्यानंतरही त्यांचा काँग्रेस नेते राहुल गांधीच होत आहे. तर दुसऱ्या बाजूला लहान भावाने चांगली गती पकडली आहे म्हणून त्याचा प्रभाव कमी करण्यासाठी पत्रकार परिषदा सुरू आहेत. मं त्री के ल्यानंतर ही लोकांमध्ये आदित्य ठाकरेंबद्दल लोकप्रियता वाढत नाही. म्हणून छोट्या भावाला लहान करण्याचा हा प्रयत्न असल्याचा आरोपही त्यांनी केला.


हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव (पूर्व), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत). संपर्कः-9594418181 / 8424989898